जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 MAY 2018
लोकमत

# विद्यापीठ प्रवेश परीक्षांच्या अर्जासाठी आज अंतिम दिवस

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांसाठी अर्ज करण्याची आज, सोमवारी अंतिम मुदत आहे. परीक्षा दि. २२ मेपासून सुरु होणार आहेत.

एम. ए., एम. एस्सी जिओग्राफी, एम. ए. मास कम्युनिकेशन, एम. एस्सी. अल्कोहल टेक्नॉलॉजी, बी.जे., एम. जे., एम.एस्सी. शुगर टेक्नॉलॉजी, ॲग्रो केमिकल ॲण्ड पेस्ट मॅनेजमेंट, एम.एस्सी. जिओलॉजी, बी.लिब., एम.लिब., एम.एस्सी. इलेक्ट्रॉनिक्सच्या परीक्षा दि. २२ मे रोजी, एम. एस्सी. मायक्रो बायोलॉजी, फार्मास्टिुकल मायक्रो बायोलॉजी, इंडस्ट्रीयल मायक्रो बायोलॉजी, झूलॉजी, बायो टेक्नॉलॉजी, बायो केमिस्ट्री दि. २३ मे रोजी होतील. एम. एस्सी., केमिस्ट्री, मॅथेमिटिक्स, फिजिक्स्साठी दि. २४ मे रोजी, तर एम.एस्सी. स्टॅटिस्टिक, ॲप्लाईड स्टॅटिस्टिक ॲण्ड इर्मोमिटीक, बॉटनी, कॉम्प्युटर सायन्स्साठी दि. २६ मे रोजी, एम.एस्सी. इनव्हारमेंटल सायन्स्, फूड सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, एम.एस्सी. टेक, एम. बी.ए. करिता दि. २८ मे रोजी, एमआरएस, एमएसडब्ल्यूसाठी दि. २९ मे रोजी परीक्षा होणार आहे.

> सर्व परीक्षांसह अर्ज करण्याची प्रक्रिया ऑनलाईन आहे. या प्रक्रियेअंतर्गत अतिविलंब शुल्कासह अर्ज करण्याची अंतिम मुदत आज, सोमवारपर्यंत आहे.
>
> \- डॉ. विलास नांदवडेकर, कुलसचिव

7 MAY 2018
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ उन्हाळ्यातही पाण्याबाबत स्वयंपूर्ण

## १८ लाखांची बचत; जूनपर्यंत पुरेसा साठा

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्य शास्त्र अधिविभागामागील तलावासह सात विहिरीतील पाणी महिनाभर पुरेल, अशी स्थिती आहे. त्यामुळे यंदा विद्यापीठाला महापालिकेचे पाणी वापरावे लागणार नाही. त्यातून विद्यापीठाची अठरा लाख रुपयांची बचत होईल.

विद्यापीठ पाण्याच्या अनुषंगाने बहुतांश प्रमाणात स्वयंपूर्ण झाले आहे. भाषा भवन संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या परिसरातील तलाव पावसाळ्यात काठोकाठ



भरतात या तलावांचे पाणी फिल्टर करून पिण्यासाठी वापरले जाते. ते ॲरोद्वारे विद्यापीठातील सर्व विभागांना गरजेनुसार पोचवले जाते. या आधी महापालिकेचे पाणी पिण्यासाठी वापरले जात होते. तलाव बांधल्यानंतर ही स्थिती बदलली.

**यंदा तलावातील पाण्याची स्थिती लक्षात घेता पाणी आटलेले नाही. ते जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पुरेल.**
**- जी. बी. मस्ती** (मेस्त्री, अभियांत्रिकी विभाग, शिवाजी विद्यापीठ)

मार्च-एप्रिलमध्ये तलावातील पाणी आटल्यास जूनपर्यंत विद्यापीठाची तहान महापालिका भागवत होते. त्याचे महिन्याकाठीचे सहा लाख रुपये बिल द्यावे लागत होते. तीन महिन्यांचा हा आकडा १८ लाख रुपयांपर्यंत पोचत होता.



**कोल्हापूर : संगीत व नाट्यशास्त्र विभागामागील तलावाची सद्यःस्थिती.**

पिण्यासाठी रोज लागणारे पाणी **50** हजार लिटर

इतर वापरासाठी लागणारे **3 ते 4** लाख लिटर

विद्यापीठातील एकूण विहिरी **7**

**3** विहिरींच्या पाण्याचा उपयोग पिण्यासाठी

तलावातील पाणी साठा असा

| | | |
|---|---|---|
| संगीत व नाट्य शास्त्र अधिविभाग तलाव | **1.86** | दशलक्ष घनफूट |
| भाषा भवन तलाव | **8.43** | दशलक्ष घनफूट |

17 MAY 2018 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# UGC invites detailed proposal for non-technical online courses

**Piyush.Bhusari**
@timesgroup.com

**Kolhapur:** To increase the content of online courses the University Grants Commission has invited a detailed proposal from academicians and institutions to create and produce such courses.

In a circular dated May 1, the UGC said that it is inviting detailed proposals from higher educational institutions and academicians to develop high quality Massive Open Online Courses (MOOCs) comparable to international standards.

A sample video of about 5 minutes is to be uploaded on YouTube, giving a brief description about the objectives and outlines of the course, so that good quality proposal for development of MOOCs is received on a regular basis.

While submitting the detailed proposal, the UGC has asked applicants to consider certain criteria to be followed.

It said that an academician or faculty having 10 years of experience teaching PG course in the concerned field can be the course coordinator. The faculty employed by the university or college will be required to submit a consent letter of the host university or institute to develop MOOCs.

As the courses carry credits or certification, they shall be cleared by the host university or institute. The institues are authorised to award degrees as per section 22 of the UGC act, 1956 and also agree to conduct end examination, assessment and grant credits or certification.

One course coordinator can offer only one course at a time.

To facilitate understanding of the concept of development and delivery of quality MOOCs course, the IIM-Bangalore, has developed MOOCs on its overall development.

It may be noted that the courses will be hosted via Study Webs of Active-Learning for Young Aspiring Minds (SWAYAM). It is an information technology platform providing high quality education on various subjects from school (Classes IX-XII) to under graduate and post graduate levels. It aims to cover all disciplines.

The UGC in its earlier public notices had shown its intention to prepare new courses in the area which are widely in demand but enough resources in terms of quality faculty are not available in all the universities.

The UGC last year had said that they want to identify such courses and had invited expression of interest from higher education institutions and academicians to develop MOOCs for these courses.

## COURSE ELIGIBILITY



- An academician or faculty with 10 years experience teaching PG course in the concerned field can be the course coordinator
- The faculty employed in university or college will be required to submit a consent letter from the host university or institute to develop Massive Open Online Courses
- As the courses carry credits or certification, they shall be cleared by the host university or institute
- One course coordinator can offer only one course at a time

7 MAY 2018
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बी. कॉम., एम. कॉम. अभ्यासक्रमात जीएसटीचा समावेश

## शिवाजी विद्यापीठाच्या विद्या परिषदेचा निर्णय

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठांतर्गत बी. कॉम. आणि एम. कॉम. या आभ्यासक्रमांतर्गत वस्तू सेवाकर अर्थात जीएसटीचा समावेश करण्यास मान्यता देण्यात आली. शिवाजी विद्यापीठाच्या विद्या परिषदेच्या शुक्रवारी झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आली होती. सचिवपदी कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर होते.

जीएसटीबाबत सर्वांगीण ज्ञान मिळविणे आवश्यक असल्याने विद्यापीठाने बी. कॉम. आणि एम. कॉम.च्या अभ्यासक्रमात जीएसटीचा समावेश करण्यात आला. या बैठकीमध्ये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ कलम ३०४ अन्वये विद्या परिषदेतून व्यवस्थापन परिषदेवर दोन सदस्यांची निवड करण्यासाठीची प्रक्रिया पूर्ण झाली. यामध्ये शिक्षक गटातून डॉ. कोरबू रसूल गफूर यांची बिनविरोध करण्यात. महिला गटामध्ये डॉ. भारती पाटील आणि डॉ. शर्मिला साबळे हे दोन उमेदवार असल्याने पूर्वघोषित कार्यक्रमानुसार दुपारी एक दोन वेळेत मतदान घेण्यात आले.

यामध्ये डॉ. पाटील यांना २६ तर डॉ. साबळे यांना ८ मते पडली. त्यामुळे डॉ. भारती पाटील यांना विजयी घोषित करण्यात आले. शिवाजी विद्यापीठांतर्गत सुरू असलेल्या बी. ए., बी. कॉम. आणि बी. एस्सी. अभ्यासक्रमांना चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टीम लागू करण्यास मान्यता देण्यात आली. त्यासाठी आवश्यक अभ्यासक्रमाची रचना, नियमावलीसह मान्यता देण्यात आली. परदेशी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठीचा सुधारित नियमावली मान्य करण्यात आली.

7 MAY 2018 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘कार्ल मार्क्सचे तत्त्वज्ञान आजही समाजास उपयुक्त’

कोल्हापूर, ता. ६ : ‘कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचे गारूड आजही समाजमनावर कायम आहे’, असे प्रतिपादन ज्येष्ठ राज्यशास्त्र विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर यांनी आज येथे केले. माणसाने स्वातंत्र्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत, हे कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचे मुख्य उद्दिष्ट होते, असेही त्यांनी सांगितले.

अर्थतज्ज्ञ कार्ल मार्क्सच्या द्विजन्मशताब्दीनिमित्त समाजवादी प्रबोधिनीसाठी प्रा. डॉ. जे. एफ. पाटील संपादित ‘प्रेषित अर्थशास्त्री : कार्ल मार्क्स’ पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. अर्थशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. पी. एस. कांबळे अध्यक्षस्थानी होते. अर्थशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात कार्यक्रम झाला.



कोल्हापूर : ‘प्रेषित अर्थशास्त्री : कार्ल मार्क्स’ पुस्तकाचे प्रकाशन करताना प्रा. डॉ. अशोक चौसाळकर. शेजारी प्रसाद कुलकर्णी, डॉ. पी. एस. पाटील, प्रा. डॉ. जे. एफ. पाटील, निहाल शिपूरकर.

डॉ. चौसाळकर म्हणाले, ‘‘मार्क्सवादाचे विचार लोकांपर्यंत पोचण्यासाठी हे पुस्तक उपयुक्त ठरेल. तत्त्वज्ञ, राज्यशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ असे बहुआयामी त्याचे व्यक्तिमत्त्व होते. त्याचे लिखाण जर्मन भाषेत असल्याने ते इंग्रजीत अनुवादित होण्यास उशीर झाला असला, तरी त्याच्या विचारांचे मोल मोठे आहे.’’ डॉ. अनिल पडोशी यांनी मार्क्सची जगासंबंधीची वैचारिक भूमिका न पुसता येणारी असल्याचे सांगितले. पी. बी. कुलकर्णी यांनी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठीचा विचार मार्क्सच्या तत्त्वज्ञानात आढळतो, तर डॉ. भालबा विभूते यांनी चौथ्या क्रांतीसाठी मार्क्सची गरज भासणार असल्याचे सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 MAY 2018
Times of India

# Engg students build drone for surveillance

TOI



Students who prepared the drone, seen along with the faculty members of DKTE

TIMES NEWS NETWORK

The students of the DKTE Society's Textile and Engineering Institute, Ichalkaranji have prepared a drone for surveillance in construction as part of their final year research project.

According to the college officials, students Snehal Pawar, Pooja Bhasme and Ashwini Ghatte, worked on the project 'Structural inspection and treatment using unmanned aerial vehicle and digital image processing' for past few months.

The project is one of its kind to inspect and observe the heritage structure as well as the regular construction buildings.

The drone is equipped with the wireless camera to observe any kind of structural damage to the target.

"It can also be useful in the chemical showering at the observed cracks in the structure," said a faculty member from the college.

## CAMPUS BUZZ

**Hobby classes at Dalvis art institute:** The city-based Dalvis art institute has organised a six-days crafty kids hobby classes for school students.

The participants will be taught handicrafts, short filmmaking, and several other crafts during the workshop begining from May 7 to May 12 at its Laxmipuri institute.

**Admission deadline to close on May 7:** The registration for the entrance exam for admission in various courses of the Shivaji University, Kolhapur (SUK) will close on Monday, May 7.

An SUK official added that, applicants who want to apply for the interested courses of M.Sc, MA and M.Com can apply by May 7 with super late fees of Rs 500.

The entrance exams will be conducted May 22 onwards and hence the university is not likely to give any extension to the registration.